# सप्टेंबर महिन्यासाठी आमंत्रण-पत्र

## रोहिणी मेनन यांच्याद्वारे लिखित

श्रीगुरुमाईंनी वर्ष २०१६पासून सिद्धयोगी आणि नवीन साधकांना निर्देश दिले आहेत की, सप्टेंबर हा महिना त्यांनी आत्मसात करण्याच्या अभ्यासासाठी समर्पित करावा. या वर्षांमध्ये, श्रीगुरुमाईंनी आत्मसात करण्याच्या अभ्यासावर विशेष भर दिला आहे. त्यांनी शिकवले आहे की, आत्मसात केल्याने आपण शक्तीला आपल्या अंतरी धारण करू शकतो आणि आपण जे अभ्यास करतो त्यांची फळे अनुभवू शकतो. या संदर्भात, श्रीगुरुमाईंनी सांगितले आहे की, वर्ष २०२६साठीचा त्यांचा संदेश एका वेळी एक-एक ओळ याप्रमाणे संपूर्ण सप्टेंबर महिन्यादरम्यान सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर पोस्ट केला जावा जेणेकरून त्यावर चिंतनमनन करणे आपल्याला सोपे होईल आणि त्यांच्या संदेशाच्या शक्तीमध्ये पूर्णपणे निमग्न होण्यास आपल्याला मदत मिळेल.

‘सप्टेंबर महिन्यासाठी आमंत्रण-पत्र’ मी कसे पाठवणार आहे याविषयी जेव्हा मी गुरुमाईंशी बोलत होते, तेव्हा त्यांनी माझ्याकडे पाहिले आणि त्या म्हणाल्या, “तुला एक प्रसंग ऐकायचा आहे का?”

मी म्हटले, “हो गुरुमाई, तो प्रसंग ऐकायला मला *नक्कीच* आवडेल!” श्रीगुरुमाईंनी जो प्रसंग सांगितला, तो मला अशा प्रकारे आठवतो आहे :

> बाबा मुक्तानंद त्यांच्या तिसऱ्या विश्वयात्रेदरम्यान सँटा मोनिका, कॅलिफोर्नियाला गेले होते, जिथे त्यांनी सत्संग केले, दर्शन दिले आणि शक्तिपात ध्यान-शिबिरे आयोजित केली. त्या टीचिंग्स व्हिझिट्मध्ये गुरुमाई बाबांच्या भाषांतरकार होत्या. त्या वेळी बाबा आणि त्या यात्रेमधील सेवाकर्ते ज्या हॉटेलमध्ये मुक्कामास होते, त्याच्या अगदी समोर प्रशांत महासागर होता.
>
> एके दिवशी, सूर्योदयापूर्वी, अगदी पहाटे जेव्हा श्रीगुरुमाई बाहेर आल्या आणि त्यांनी पश्चिमी क्षितिजाकडे पाहिले, तेव्हा ते दृश्य पाहून त्या विस्मयाभिभूत झाल्या. तिकडे दूर क्षितिजावर एक विशालकाय असे सोनेरी मंडल होते, जे तेजस्वितेने चमकत होते आणि त्याच्या प्रकाशाने खाली असलेल्या सागराचे जल प्रकाशमान होत होते.
>
> ते एक अविश्वसनीय दृश्य होते. श्रीगुरुमाईंनी त्यापूर्वी असे दृश्य कधीही पाहिले नव्हते. त्यांनी विचार केला, “असा अनुभव मला ध्यानात येतो, तेव्हा मी *निश्चितच* ध्यानात

असणार!" जागृत अवस्थेत अशा प्रकारचे दृश्य खरोखर दिसू शकते, याची त्या कल्पनाच करू शकत नव्हत्या.

असे वाटले की, ते दृश्य न्याहाळत असताना जणू एक युग लोटले आहे. अखेरीस, श्रीगुरुमाई खाली बागेत गेल्या, जिथे त्यांना काही इतर सेवाकर्ते भेटले. त्यांनी त्या सेवाकर्त्यांना सांगितले की, सगळ्यांनी त्यांच्यासमवेत यावे आणि ते दृश्य पाहावे व या गोष्टीची पुष्टी करावी की, ते दृश्य त्यांच्या परमानंदाच्या स्थितीतून तर उदित होत नाही ना! क्षितिजावर सोनेरी गोलाकार मंडल पाहून सगळ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि उत्साह जेव्हा गुरुमाईंनी पाहिला, तेव्हा त्यांना उमजले की, तो खरोखरच चंद्र होता!

प्रशांत महासागरावर पौर्णिमेचा चंद्र पाहण्याचा श्रीगुरुमाईंचा हा अगदी पहिलाच अनुभव होता. आणि गुरुमाईंच्या हे स्पष्टपणे लक्षात आहे की, ते दृश्य पाहून कोणीतरी उद्गारले होते, "अरे वाऽऽ! हा तर 'हार्वेस्ट मून' आहे." ['हार्वेस्ट मून' म्हणजे पीककापणीच्या महिन्यातील चंद्र.]

श्रीगुरुमाईंनी हेदेखील सांगितले की, तेव्हापासून ते दृश्य त्यांच्या चेतनेवर कायमचे कोरले गेले आहे.

श्रीगुरुमाई जेव्हा म्हणाल्या की, त्यांनी पाहिलेला तो पूर्ण चंद्र 'हार्वेस्ट मून' म्हणजे पीककापणीच्या महिन्यातील चंद्रासमान होता, तेव्हा तो माझ्यासाठी 'अहाऽऽ क्षण' होता, त्या क्षणी मला अंतरी काहीतरी उलगडल्यासारखे वाटले. माझ्या लक्षात आले की, सिद्धयोग मार्गावर आत्मसात करण्याचा वार्षिक अभ्यास हा सप्टेंबरच्या महिन्यात असतो, जो पीककापणीचा काळ असतो. म्हणून, 'हार्वेस्ट' या इंग्रजी शब्दाचे महत्त्व जाणून घेण्याची उत्सुकता माझ्या मनात निर्माण झाली.

आधुनिक इंग्रजी शब्द 'हार्वेस्ट' हा प्राचीन इंग्रजी शब्द 'हारफेस्ट'पासून आला आहे, ज्याचा अर्थ 'ऑटम' [म्हणजे शरद ऋतू] असा आहे. काही विशिष्ट आधुनिक शब्दांचे मूळ शोधून काढण्यासाठी ऐतिहासिक भाषाशास्त्रज्ञ प्राचीन सभ्यता तसेच त्यांच्या भाषा यांबद्दलच्या पुराव्यांचा शोध घेतात. त्यांच्या संशोधनातून आपल्याला हे समजले आहे की, 'हार्वेस्ट' या शब्दाचे मूळ 'कर्प' मानले जाते, ज्याचा अर्थ 'तोडणे' किंवा 'गोळा करणे' असा आहे. चार हजार वर्षांपासून जगातील भाषांमध्ये जसजसे व्यापक बदल होत गेले, तसतसा 'कर्प' शब्दाचा स्वरदेखील विकसित होत गेला—ज्यामध्ये 'क'चा स्वर बदलून 'ह' झाला आणि 'प'चा स्वर बदलून 'फ' झाला. अंदाजे अकराव्या शतकापर्यंत, 'हारफेस्ट' हा शब्द वापरात होता. कालांतराने, 'हारफेस्ट'—आणि अखेरीस 'हार्वेस्ट'—या शब्दाचा

अर्थ केवळ पिके गोळा करण्याचा काळ इतकाच राहिला नाही, तर मुळात पिके *आणि* ती पिके गोळा करण्याची कृती या अर्थानेदेखील तो प्रयोगात आणला जाऊ लागला.

मी जेव्हा पौर्णिमेच्या चंद्राविषयीचा श्रीगुरुमाईंचा अनुभव ऐकत होते, तेव्हा मला एक प्रकारच्या सहजस्थितीची जाणीव होऊ लागली. मी जणूकाही त्या दृश्यात हरवून गेले होते. आत्मसात करणे आणि पिकांची कापणी करणे यांच्यातील परस्पर संबंधाविषयी मला एक बोध झाला, माझ्या अंतरी एक समज उदयास आली. गुरुमाईंनी मला जे सांगितले होते, ते मला योग्य प्रकारे समजले आहे किंवा नाही हे मला त्यांच्याकडून जाणून घ्यायचे होते. मी त्यांना विचारले, “हा प्रसंग असे दर्शवतो का की, कधीकधी एखाद्या साधकाने तो अनुभव स्वतःकडे येऊ द्यावा?”

श्रीगुरुमाई म्हणाल्या, “हो. लोक ‘प्रयत्न करण्या’च्या इतके मागे लागतात की, ते त्या अनुभवाला मुकतात.”

त्यावर मी म्हणाले, “म्हणजे अनुभव हा नेहमीच उपलब्ध असतो आणि साधकाने तो होऊ दिला पाहिजे?”

श्रीगुरुमाई म्हणाल्या, “हो. आणि अशा प्रकारचा अनुभव जेव्हा होतो, तेव्हा तो जादूसम असतो. ही ज्योतिर्मय आकाशीय पिंडे—ही तुम्हाला याचा अतिशय स्पष्ट व प्रत्यक्ष अनुभव देतात की, जादू खरोखरच काय असते.”

तेव्हा आता, आपण या गोष्टीकडे परत येऊ आणि हे पाहू की, सप्टेंबर महिना आपल्या सर्वांसाठी कसा असणार आहे. एक साधक म्हणून या वर्षभरात आपण आपल्या सिद्धयोग साधनेमध्ये जे प्रयत्न केले आहेत, त्यांच्यापासून मिळणाऱ्या भरघोस पिकांचा लाभ घेण्यासाठी हा निश्चितच योग्य महिना आहे. श्रीगुरुमाईंनी १ जानेवारीला ‘मधुर सरप्राइझ्’मध्ये त्यांचा संदेश प्रदान केला होता आणि त्या सत्संगापासून आपण त्यांच्या संदेशावर चिंतनमनन करत आहोत व सिद्धयोगाचे अभ्यास करत आहोत.

आणि म्हणून, सप्टेंबर महिन्यासाठी श्रीगुरुमाई जे सांगत आहेत, ते मला अशा प्रकारे समजले आहे की, “निवांत बसा आणि तुमच्या साधनेच्या फळांचा आनंद घ्या.” अशा प्रकारे आपल्याला मार्गदर्शन करून श्रीगुरुमाई आपल्याला सांगत आहेत की, आतापर्यंत आपण जे काही केले आहे,

त्याची आपण कदर करावी, त्याविषयी आपण कृतज्ञतेचा व कौतुकाचा भाव ठेवावा. चला, सप्टेंबरच्या या महिन्यात आपण वेळ काढून वर्ष २०२६साठीच्या श्रीगुरुमाईंच्या संदेशाचे पुन्हा अवलोकन करू या, आपण या समजूतीसह संदेशाकडे पाहू या की, आपण त्याची फळे अनुभवत आहोत—आपण त्याचे पावन सौंदर्य पाहत आहोत, त्याचा आनंददायक रस चाखत आहोत, त्याचा मनमोहक सुगंध श्वासात भरून घेत आहोत.

या महिन्यात, आत्मसात करण्याचा अभ्यास करत असताना, आपण स्वतःशी सौम्यतेने वागू या, असे काहीतरी करू या जे आपण स्वतःसाठी कोमल हृदयाने केलेले असेल. आपण हे कसे करायचे? मी जो अभ्यास करते, तो मी तुम्हाला सांगू इच्छिते : माझे मन जेव्हा मला या विचारांनी सतावते की, “मी हे करू शकले असते,” “मी हे *आणखी थोडे* करू शकले असते,” “मी तसे करायला हवे होते,” “मी तसे *आणखी थोडे* करायला हवे होते,” तेव्हा मला माझ्या अंतरी श्रीगुरुमाई असे म्हणत असल्याचे ऐकू येते, “रोहिणी, याची गरज नाही. असे विचार बस सोडून दे.”

या सप्टेंबर महिन्याविषयी मला जे समजले आहे, ते हे की, आत्मसात करण्याचा अभ्यास करत असताना आपण बीजे पेरत नाही आहोत किंवा शेताची नांगरणीदेखील करत नाही आहोत. आपण पिकांची कापणी करत आहोत!

सिद्धयोग मार्गावर सप्टेंबर महिन्यासाठी मी हे आमंत्रण-पत्र लिहित असताना माझ्या मनश्चक्षूंसमोर एक दृश्य उभे राहिले, जे मी तुम्हाला सांगू इच्छिते. श्रीगुरुमाईंच्या वर्ष २०२६साठी असलेल्या संदेशाच्या प्रत्येक ओळीवर विचार करत असताना तुम्ही अशी कल्पना करू शकता की, तुम्ही एका शेताकडे पाहत आहात, जे तुमच्या आवडीच्या पीकाने समृद्ध आहे किंवा तुमच्या आवडीच्या फुलांनी बहरलेले आहे—मग ते पीक मक्याचे असू शकते, गव्हाचे किंवा तांदळाचे असू शकते किंवा चहूबाजूंना ट्युलिपच्या फुलांचा, लॅव्हेंडरचा वा सूर्यफुलांचा अथवा जंगली फुलांचा बहर असू शकतो किंवा फळांची लगडलेली बागदेखील असू शकते. तुमच्या कल्पनेला कोणतीही सीमा नाही! त्या दृश्याची व्यापकता अनुभवा. तुमचा श्वास कसा हळुवारपणे खोलवर जातो आणि त्याने तुम्हाला तणावमुक्ततेची जी सुखद भावना जाणवते, तिचा आनंद घ्या. या वर्षभरात तुम्ही जी साधना करत आला आहात, त्यासाठी हृदयात कृतज्ञता अनुभवा. पाहा की, तुमच्या साधनेच्या फळाच्या अद्‌भुत आनंदात निमग्न होऊन तुमचे संपूर्ण अस्तित्व कसे कृतार्थता अनुभवते.

वर्ष २०२६साठीचा श्रीगुरुमाईंचा संदेश आत्मसात करण्याबरोबरच, सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर एका गॅलरीच्या माध्यमातून आपल्याला श्रीगुरुमाईंचे दर्शन घेण्याचे सौभाग्यदेखील प्राप्त होणार आहे. प्रत्येक आठवड्यात या गॅलरीत, जानेवारी २०२६ ते ऑगस्ट २०२६

दरम्यानच्या, श्री मुक्तानंद आश्रमातील विविध दृश्यांचा संग्रह असेल. या गॅलरीचे शीर्षक आहे, ‘गुरुमाई चिद्विलासानंदांच्या सान्निध्यात.’

या सप्टेंबर महिन्याचा पुरेपुर लाभ तुम्ही घ्यावा यासाठी तुम्हाला हे आमंत्रण आहे. आणि तुम्ही तो लाभ कसा घ्याल? तर, तुमच्या साधनेच्या फळांच्या रूपातील पीकाची कापणी करा आणि दररोज सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटला भेट द्या.

© २०२६ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.